प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०२.११.२०२०**

## सिडकोमध्ये 'सतर्क भारत, समृद्ध भारत' संकल्पनेवर आधारित दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार दरवर्षीप्रमाणे सिडको महामंडळामध्ये **२७ ऑक्टोबर २०२० ते ०२ नोव्हेंबर २०२०** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. सिडकोच्या सीबीडी बेलापूर येथील मुख्यालयासह सिडकोची नोडल कार्यालये, नवीन शहर कार्यालये येथे हा सप्ताह साजरा करण्यात आला. यावर्षीच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची 'सतर्क भारत, समृद्ध भारत' (Vigilant India, Prosperous India) ही संकल्पना होती.

केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. आयोगाच्या निर्देशांनुसार सिडकोच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सत्यनिष्ठेची शपथ घेतली. सप्ताहाच्या कालावधीत भ्रष्टाचारविरोधी जनजागृती व दक्षता या विषयावर आधारित भित्तीफलक (बॅनर) सिडकोच्या सर्व कार्यालयांच्या दर्शनी भागात तसेच ऐरोली ते पनवेल दरम्यानच्या प्रत्येक रेल्वे स्थानकावर लावण्यात आले. महामंडळातील निवडक अधिकाऱ्यांकरिता 'दक्षता जागरूकता' या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा देखील आयोजित करण्यात आली होती.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनानुसार देशभरातील शासकीय व निमशासकीय संस्था आणि कार्यालयांमध्येही या सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. अधिकारी व कर्मचारी वर्ग, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी; समाजाच्या अशा विविध स्तरांतील घटकांमध्ये भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण होऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन व्हावे, या उद्देशाने दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**